जा.क्र.रामं./साआ व कुक/वैशि/अ व औप्र/वस्त्रो./सांका/नोट/३९०।

राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

पोलिस महासंचालक
"अ" बाबत प्रवासा दरम्यान
संबधीत संतांना सुरक्षा व्यवस्था
देणे बाबत उचित कार्यवाही करावी
20/6/2022

राज्यमंत्री
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण
वैद्यकीय शिक्षण, अन्न व
औषध प्रशासन, वस्त्रोद्योग
सांस्कृतिक कार्ये
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : १८.०६.२०२२

प्रति,

मा. शंभूराजे देसाई साहेब
गृहराज्यमंत्री ( ग्रामीण )
महाराष्ट्र राज्य

"अ" || **विषय : महान तपस्वी संतशिरोमणी पूजनीय राष्ट्रसंत आचार्य श्री विद्यासागर महाराज यांचे महाराष्ट्र राज्यातील विहारादरम्यान पोलीस सुरक्षा व बंदोबस्त उपलब्ध करून देणे बाबत..**

जैन धर्म समुदायातील सर्वांना पूजनीय व परमआदरस्थानी असलेले पुज्यनिय संतशिरोमणी १०८ आचार्यश्री विद्यासागर महाराज यांचे ५० वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर धर्मकार्यार्थ महाराष्ट्र राज्यात आगमन होत आहे. आचार्यश्री विद्यासागर महाराज यांच्या लाखो अनुयायांसाठी ही अत्यंत श्रध्देची व आनंदाची बाब आहे. देशाच्या विविध भागातून येणारे व राज्यातील सर्व वयोगटातील जैन श्रावक व श्राविका त्यांच्या स्वागतासाठी आतुर असून मध्यप्रदेश येथील पांढुरणा जिल्हा बैतुल येथून महाराष्ट्रातील अमरावती व वाशीम येथे होणाऱ्या आगमनासाठी सर्व जैन बांधव सज्ज आहेत.

महाराजांचे जैन धर्मियांच्या दृष्टीने असलेले उच्च स्थान, आदर व त्यांचे लाखो अनुयायी गृहीत धरून त्यांना पोलीस सुरक्षा व विहारादारम्यान होणारी गर्दी लक्षात घेऊन पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त उपलब्ध करण्याच्या सूचना अमरावती व वाशीम तसेच विहार मार्गात येणाऱ्या सर्व जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक यांना तातडीने देण्यात याव्यात. स्थानिक जैन बांधव आवश्यक ते सर्व सहकार्य तसेच विहार कार्यक्रमाची माहिती देण्यास तयार आहेत. संभाव्य विहार मध्यप्रदेशातील पांढुरणा ते वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील जैन शिरपूर येथे आहे. आगमनाचा दिनांक २० जून २०२२ असून विहाराचे पायी अंतर अंदाजे २५० किमी आहे जैन धर्मियांच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन याबाबत शासनस्तरावर या माध्यमातून योग्य संदेश जाईल याबाबत उचित कार्यवाही करावी अशी विनंती समस्त जैन बांधवांतर्फे मी करीत आहे.

धन्यवाद

आपला

राजेंद्र पाटील यड्रावकर

Scanned with CamScanner